दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● शुक्रवार दि.१० ऑक्टोबर २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक ५३ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Friday 10 Oct 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 53 ● Pages 4 ● Rate 4 Rs

### नेत्यांपेक्षा कार्यकर्त्यांची भाषणे महत्त्वाची ठरतील

**मुंबई**–महाराष्ट्रातून अनेक ओबीसीचे नेते या मोर्चात येणार आहेत. नेत्यांसोबत सामाजिक चळवळीमध्ये ओबीसींच्या संघर्षामध्ये, ओबीसींच्या हक्कासाठी लढणाऱ्या संघटना आहेत, त्या संघटनांच्या प्रतिनिधींना सुद्धा मार्गदर्शन करण्यासाठी आम्ही पाचारण केले आहे. त्याचसोबत विविध विभागातील ओबीसींचे तज्ज्ञांना देखील सकल ओबीसी समाजाला मार्गदर्शन करता येईल, अशी व्यवस्था केलेली आहे. नेत्यांच्या भाषणापेक्षा ओबीसी चळवळीमध्ये काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची भाषणे उद्या महत्त्वाची ठरणार आहेत, असे विजय वडेट्टीवार यांनी सांगितले.

# मोदी हात लावतात तिथे सोने होते:एकनाथ शिंदेंचा पंतप्रधानांवर कौतुकाचा वर्षाव

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई (वृत्तसंस्था)**

वी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या उद्घाटन सोहळ्यात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर कौतुकाचा वर्षाव केला. मोदीजी लोकप्रिय, यशस्वी आणि कर्तव्यदक्ष प्रधानमंत्री आहेत. जेव्हा जेव्हा ते महाराष्ट्रात येतात, तेव्हा विकासाच्या नवनव्या वाटा खुल्या होतात. मोदी हात लावतात तिथं सोनं होतं; मोदी है तो मुमकीन है, अशा शब्दांत शिंदे यांनी मोदींच्या कामाचा उल्लेख केला.आगामी निवडणुकांमध्ये विकास आणि लोक कल्याणाचा झेंडा हाती घेतलेली महायुतीच विजयी होईल, विजयी पताका फडकवणार, या बाबत माझ्या मनात शंका नसल्याचे एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. या माध्यमातून एकनाथ शिंदे यांनी आगामी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीच्या प्रचाराचा अप्रत्यक्षपणे शुभारंभ केला.आपल्या भाषणात एकनाथ शिंदे यांनी महाविकास आघाडी सरकारवर जोरदार हल्लाबोल करताना ते सरकार म्हणजे स्थगिती सरकार होतं असा टोला लगावला. त्या काळात प्रकल्प फाइल्स थांबल्या होत्या, निर्णय पुढे ढकलले जात होते. मात्र, आज केंद्र आणि राज्य या दोन्ही सरकारांचा समन्वय असल्याने विकासाला गती मिळत आहे, असे ते म्हणाले. त्यांनी सांगितले की, आठ वर्षांपूर्वी मोदीजींच्या हस्ते या ग्रीनफिल्ड विमानतळाचे भूमिपूजन झाले होते आणि आज त्यांच्या हस्तेच उद्घाटन होत आहे, हा महाराष्ट्रासाठी अभिमानाचा क्षण आहे.एकनाथ शिंदे म्हणाले की, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हा फक्त एक प्रकल्प नाही, तर नव्या भारताच्या संकल्पाचे प्रतीक आहे. हे विमानतळ महाराष्ट्राच्या आर्थिक, व्यापारी आणि पर्यटन क्षेत्राला नवे पंख देणार आहे. प्रगती आणि विकास हे मोदीजींच्या हाताशी नेहमी असतात. जिथं मोदी जातात, तिथं विकासाची सुवर्णरेषा उमटते. आज नवी मुंबई हे उदाहरण आहे. मोदीजींच्या नेतृत्वामुळे महाराष्ट्रात अनेक



महामार्ग, बंदरे, मेट्रो प्रकल्प, तसेच औद्योगिक कॉरिडॉर यांची गती वाढली आहे. हे विमानतळ या सर्व प्रगतीचा नवा टप्पा ठरणार असल्याचा दावा देखील शिंदे यांनी केला.मुंबईत एका टोकापासून दुसऱ्या टोकाला जायला केवळ एकच तास लागायला हवा. हे काम केवळ आणि केवळ महायुतीत करू शकते. आपण पाहिले की देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना त्यांनी अनेक विकास प्रकल्प सुरू केले. त्यानंतर महाविकास आघाडीचे सरकार आले आणि त्यांनी अनेक प्रकल्पामध्ये अडथळे टाकले आणि त्याला स्थगिती दिली. त्यामुळेच पुन्हा २०२२ मध्ये महायुतीचे सरकार आले. स्थगिती सरकार आपण हटवून टाकले. स्पीडबेकर उखडून टाकले. त्यामुळेच गेल्या तीन वर्षात राज्याचा विकास डबल वेगाने होत असल्याचा दावा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला आहे. नरेंद्र मोदी यांच्या आशीर्वादाने देशातील सर्वोत्कृष्ट इन्फ्रास्ट्रक्चर प्रकल्प हे महाराष्ट्रात उभे राहत असल्याचा दावा देखील शिंदे यांनी केला आहे.राज्याचा विकास होत असताना दुसरीकडे आपण शेतकऱ्याला देखील वाऱ्यावर सोडलेले नाही. आज आपला बळीराजा शेतकरी संकटात आहे. या पूरग्रस्तांसाठी देखील कालच मुख्यमंत्री महोदय आणि आम्ही ३२ हजार कोटींचे पॅकेज जाहीर केले आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची दिवाळी काळी होऊ नये हा शब्द आम्ही पाळला असल्याचा दावा एकनाथ शिंदे यांनी केला आहे.नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकार देखील कायम शेतकऱ्यांच्या पाठीशी उभी राहिले आहे. शेतकरी सन्मान निधीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात निधी दिला जात आहे. शेतकऱ्यांना काय दिले? असा प्रश्न विरोधी पक्षातील काही नेते उपस्थित करतात. मात्र त्यांना ही आकडेवारीच माहीत नसल्याचे शिंदे यांनी म्हटले आहे. मात्र आपल्या शेतकऱ्यांना आणि बळीराजाला या सर्वांची पूर्ण जाणीव आहे. काँग्रेस सरकारच्या काळामध्ये महाराष्ट्राला दिलेल्या निधीच्या तुलनेत पाच पट जास्त मदत नरेंद्र मोदी सरकारने महाराष्ट्राला दिली असल्याचे एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. ही मदत कायमस्वरूप राहील, असा विश्वास देखील त्यांनी व्यक्त केला.

# सरन्यायाधीश भूषण गवईंवर हल्ला करणाऱ्या देशद्रोही राकेश किशोरला परळीकरांनी जोडे मारून केला निषेध

## संविधान प्रेमी नागरिक व सर्वपक्षीय नेत्यांचा निदर्शनात सहभाग

**दैनिक वादळ वार्ता**
**परळी । प्रतिनिधी**

भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांच्यावर बूट फेक करणाऱ्या देशद्रोही वकील राकेश किशोरच्या प्रतिमेस परळीकरांनी मुख्य चौकात जोडे मारून त्याचा निषेध केला. या घटनेच्या निषेधार्थ परळी शहरात दिनांक ९ ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या निदर्शनात शहरातील संविधान प्रेमी व सर्वपक्षीय नेते आणि कार्यकर्त्यांचा मोठ्या संख्येने सहभाग होता.भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश बी .आर.गवई यांच्यावर सनातनी वृत्तीच्या



हल्लेखोर राकेश किशोर या वकिलाने सुप्रीम कोर्टात सुनावणी सुरू असताना बुट फेकून मारण्याचा प्रयत्न केला. त्याच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा व त्याला केंद्र सरकारने अटक करावी या मागणीसाठी आज दिनांक ९ ऑक्टोबर रोजी राणी लक्ष्मीबाई टॉवर चौक येथे सकाळी ११ वाजता तमाम संविधान प्रेमी नागरिकांकडून तीव्र निदर्शने करण्यात आली. तसेच राकेश किशोरच्या प्रतिमेस उपस्थित संविधान प्रेमी नागरिक व सर्वपक्षीय नेते आणि कार्यकर्त्यांनी जोडे मारून त्याचा तीव्र निषेध केला. विविध राजकीय पक्षांचे नेते आणि कार्यकर्ते यांनी आपल्या तीव्र भावना यावेळी व्यक्त केल्या.या निदर्शनात शहरातील नागरिक मोठ्या संख्येने राणी लक्ष्मीबाई टॉवर येथे उपस्थित होते. हातामध्ये भारतीय तिरंगा ध्वज घेऊन भारतीय संविधानाचा विजय असो, हल्लेखोर राकेश किशोर याच्यावर कठोर कारवाई करावी , देश द्रोहाचा गुन्हा दाखल करावा अशा प्रकारच्या घोषणा यावेळी देण्यात आल्या. निदर्शने झाल्यानंतर राष्ट्रपतींच्या नावे परळीच्या तहसीलदारा मार्फत निवेदन देण्यात आले.

# नंदुरबार जिल्हा: पंचायत समिती सभापती पदाच्या आरक्षणाची सोडत १३ ऑक्टोबरला



**दैनिक वादळ वार्ता**
**नंदुरबार । दिपक गोसावी**

आगामी पंचायत समिती निवडणुकांनंतर गठित होणाऱ्या नंदुरबार जिल्ह्यातील पंचायत समित्यांच्या सभापती पदाच्या आरक्षणाची सोडत अखेर जाहीर झाली आहे. पहिल्या अडीच वर्षांच्या कालावधीसाठी असणाऱ्या या पदांसाठी सोमवार, १३ ऑक्टोबर २०२५ रोजी सोडत काढण्यात येणार आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बिरसा मुंडा सभागृहात दुपारी १२.०० वाजता ही सोडत प्रक्रिया पार पडेल. उपजिल्हाधिकारी (महसूल) प्रमोद भामरे यांनी एका शासकीय प्रसिद्धी पत्रकान्वये ही माहिती कळविली आहे.अनुसूचित जमाती आणि अनुसूचित जमातीच्या महिलांसाठी हे सभापती पद आरक्षित करण्यात आले आहे. जिल्हा परिषद अथवा पंचायत समितीतील रहिवाश्यांनी आणि सर्व नागरिकांनी या महत्त्वाच्या सोडतीच्या सभेस मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन उपजिल्हाधिकारी श्री. भामरे यांनी केले आहे.या सोडतीमुळे जिल्ह्यातील राजकीय वातावरण तापणार असून, आगामी निवडणुकांमध्ये सभापती पदासाठी कोणत्या पंचायत समितीला कोणते आरक्षण मिळते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# सतीश पायाळसह कार्यकर्त्यांचा अजय सरवदे यांच्या नेतृत्वात वंचित प्रवेश–बालघाटात राजकीय हलचल

**दैनिक वादळ वार्ता**
**बीड । प्रतिनिधी**

अजय सरवदे यांच्या नेतृत्वाखाली नकनूर, कुंभारी, सोनपेठ व बाळापूर येथील असंख्य कार्यकर्त्यांसह बालघाटाचा बुलंद आवाज सतीश पायाळ यांनी वंचित बहुजन आघाडीत भव्य प्रवेश केला.



सतीश पायाळ यांनी यापूर्वी रिपब्लिकन सेनेचे जिल्हाध्यक्ष म्हणून कार्य करत असताना समाजहिताच्या अनेक प्रश्नांवर भूमिका घेतली होती. आज ते वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ड. प्रकाश उर्फ बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून, समाजहिताचे प्रश्न सोडविण्यासाठी आणि त्यांच्या हातांना मतदानरूपी बळ देण्यासाठी आघाडीत दाखल झाले.या प्रसंगी जिल्हा महासचिव खंडू देवराव जाधव, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख राजेशकुमार जोगदंड, सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे जिल्हाध्यक्ष रोहन मगर, वंचित बहुजन आघाडी बीड शहर प्रमुख मिलिंद सरपते यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.यावेळी सतीश पायाळ यांच्यासह भैय्या करडे, स्वप्नील दुनघव, तेजस चौगुले, जिवन ढोकणे, सागर निर्मळ, मयुर निर्मळ, कुणाल लांडगे, साहिल ढोकणे, रोशन धिगर, राजेंद्र वारभवन, सुधीर निर्मळ, सखाराम पायाळ, अक्षय गुळवे, नामदेव गायकवाड, विकास गंगावणे, अर्जुन धन्वे, शहादेव पायाळ, बाळू गायकवाड, बालू वारभवन, मल्हारी चक्रे, सिकंदर पायाळ, भिमराव पायाळ, मयुर ढोकणे यांसह मोठ्या संख्येने कार्यकर्त्यांनी वंचित बहुजन आघाडीत प्रवेश करून पक्षाला बळ दिले.जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी नव्याने दाखल झालेल्या सर्व कार्यकर्त्यांचे स्वागत करताना सांगितले की, वंचित बहुजन आघाडी भाजपची बी टीम आहे असा खोटा अपप्रचार करून वंचितकडील मतदारांना वळविण्याचे षडयंत्र या ठिकाणचे प्रस्थापित पुढारी करत आहेत. वंचित बहुजन आघाडी ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची खरी वारसदार आहे. समाजातील प्रत्येक वंचित, शोषित घटकाच्या हक्कासाठी आम्ही संघर्षरत राहू. सतीश पायाळ यांचा पक्षप्रवेश हा या संघर्षाला नवे बळ देणारा ठरेल.

# अवैध गांजा तस्करीवर स्थानिक गुन्हे शाखेची मोठी कारवाई २,१३,५००/- किमतीचा मुद्देमाल जप्त, २ आरोपींना अटक

**दैनिक वादळ वार्ता**
**नंदुरबार । दिपक गोसावी**

दिनांक ८/१०/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांना गोपनीय माहिती मिळाली की, एमएच १८ सी जी २५६३ या क्रमांकाच्या काळ्या रंगाच्या होंडा मोटारसायकलवरून दोन इसम गांजा सदृश्य अंमली पदार्थ घेऊन शिरपूरकडून शहादाकडे वाहतूक करत आहेत. स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी मानवी मेंदूवर विपरीत परिणाम करणारे गांजाची विक्री करण्याच्या उद्देशाने ही वाहतूक केली जात असल्याची खात्रीशीर माहिती मिळाल्यावर, जिल्हा पोलीस अधीक्षक श्रवण दत्त. एस यांच्या मार्गदर्शनाखाली हेमंत पाटील यांनी पथकाला कारवाई करण्याचे निर्देश दिले.

मिळालेल्या माहितीनुसार, पोलीस पथक सारंगखेडा-दोंडाईचा रस्त्यावर कहाटूळ फाटा येथे सापळा रचून उभे होते. काही वेळाने वर्णनानुसार मोटारसायकलवर दोन इसम येताना



दिसले. त्यांच्या पाठीमागे सॅक (बॅग) होती. पथकाला संशय आल्याने त्यांनी वाहनास थांबवले. मोटारसायकलचा क्रमांक एमएच १८ सीजी २५६३ असा होता. वाहनावरील इसमांना त्यांची नावे विचारली असता, त्यांनी चालक १. संतोष देवसिंग पावरा, वय २० वर्षे, रा. गधडदेव, ता. शिरपूर, जि. धुळे आणि पाठीमागील इसम २. किरण आप्पा डामरे, वय २२ वर्षे, रा. मलगाव, ता. शहादा, जि. नंदुरबार अशी सांगितली. त्यांच्या ताब्यातील बॅगबद्दल विचारणा केली असता, ते उडवाउडवीची उत्तरे देऊ लागले. त्यामुळे संशय बळावून पोलिसांनी सॅकची तपासणी केली असता, त्यामध्ये तीव्र वासाचा गांजा सदृश्य अंमली पदार्थ आढळून आला. जप्त केलेला मुद्देमाल व गुन्हा: पथकाने एकूण ६ किलो ६७५ ग्रॅम वजनाचा सुका गांजा (अंमली पदार्थ) आणि मोटारसायकल असा एकूण २,१३,५००/- (दोन लाख तेरा हजार पाचशे रुपये) किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला. दोन्ही आरोपींविरुद्ध सारंगखेडा पोलीस ठाणे येथे गु.र.नं. १६४/२०२५ नुसार गुंगीकारक औषधी द्रव्य व मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम-१९८५ चे कलम २० (ब), २२ (ब) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नंदुरबार जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्रवण दत्त. एस आणि अपर पोलीस अधीक्षक आशित कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील आणि त्यांच्या पथकाने ही यशस्वी कारवाई केली.

# सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यासोबत गैरवर्तन करणाऱ्या राकेश केशव नावाच्या वकिलावर कडक कार्यवाही करा–आश्रूबा खरात आरपीआय (ए) तालुका अध्यक्ष

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

जातीय द्वेषातून सर न्यायाधीश भूषण गवई यांच्यासोबत राकेश केशव नावाच्या वकिलाने गैरवर्तन केले त्यामुळे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर) पक्षाच्या वतीने जाहीर निषेध व्यक्त करण्यात आला आहे.भारतदेशाच्या सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश श्री.भूषण गवई यांच्यावर जातीय मानसिकतेने राकेश केशव नावाचा वकील धावून गेला आणि तो पायातला बूट काढणार त्याचवेळी न्यायालयातील सुरक्षारक्षक त्याच्या दिशेने धावले व न्यायालयाबाहेर नेले त्यामुळे मोठा अनर्थ टळला सनातन का अपमान नही सहेंगा हिंदुस्तान अशा घोषणा सडलेल्या मनोवादी वकिलांनी यावेळी दिल्या होत्या,त्यामुळेरिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर) पक्षाच्या वतीने या वकिलाचा जाहीर निषेध करून या वकिलावर कडक कार्यवाही करावी अशी मागणी दि.०९.१०.२०२५ रोजी केज तहसीलदार यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. हे निवेदन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आंबेडकर पक्षाचे राष्ट्रीय नेते दीपक(भाऊ) निकाळजे यांच्याआदेशाने व मराठवाडा अध्यक्ष भगवंत आप्पा वायबसे यांच्या मार्गदर्शनाखाली दिले आहे.या प्रसंगी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आंबेडकर पक्षाच्या मराठवाडा महिलाअध्यक्ष आम्रपाली गजेशिव, मराठवाडा प्रवक्ते ज्ञानेश्वर गिरी,जिल्हा प्रसिद्धी प्रमुख बीड बाळासाहेब जाधव,केज तालुका अध्यक्ष आश्रुबा खरात आणि कार्यकर्ते उपस्थित होते.



संपादकीय

# वृद्धांचा सन्मान आणि सुरक्षितता

माध्यमांनी वृद्धांचे सकारात्मक योगदान आणि त्यांचे अनुभव प्रदर्शित करून समाजातील वृद्धांविषयीचे नकारात्मक पूर्वग्रह तोडण्याचे काम केले पाहिजे; शाळांमध्ये वृद्ध सन्मान किंवा अनुभव-विनिमय कार्यक्रम राबवून तरुण पिढीमध्ये वृद्धांविषयी आदर आणि जबाबदारीची भावना रुजवावी लागेल तसेच स्थानिक समाजस्तरावर स्वयंसेवी उपक्रम, स्थानिक क्लब व सांस्कृतिक संस्थांद्वारे वृद्धांना सक्रियपणे सहभागी करून घेण्याचे कार्यक्रम राबविले, तर वृद्धांचा सामाजिक सहभाग आणि आत्मसन्मान वाढेल, ज्यामुळे शोषणासाठी सामाजिक जागा कमी होतील.भारताच्या सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरेत वृद्धांना आदर, संरक्षण आणि कुटुंबीय जबाबदारीचे स्थान दिले गेले आहे; परंतु अलीकडील राष्ट्रीय गुन्हे नोंदणी संचालनालयाच्या (एनसीआरबी-२०२३) अहवालातील आकडेवारीने आणि त्यावर आधारित विविध माध्यमांच्या अभ्यासाने दर्शविले आहे की वृद्धांविरुद्ध होणाऱ्या अत्याचारांचे स्वरूप, प्रमाण आणि प्रसार यामध्ये लक्षणीय बदल होत आहेत. हे बदल फक्त वैयक्तिक पातळीवरील गुन्हेगिरीचे स्वरूप नाहीत, तर त्या समाजाच्या कुटुंबसंरचना, आर्थिक व्यवस्था, तंत्रज्ञानवापर आणि प्रशासनाच्या प्रतिसादाचे प्रतिबिंब आहेत. २०२३ मध्ये देशात वृद्धांविरुद्ध नोंदवलेल्या गुन्हे प्रकरणांची एकूण संख्या २७,८८६ इतकी नोंदली गेली आहे, जी २०२२ मधील वृद्धांविरुद्ध नोंदवलेल्या २८,५४५ गुन्हे प्रकरणांपेक्षा किंचित घट दर्शवते; मात्र हा सांख्यिकीय आकडा स्वतःमध्ये धोका कमी झाल्याचे दर्शवितो असे मानण्यासारखे नाही तर खरं चित्र खोल आणि मिश्र आहे कारण घट असलेल्या काही घटकांच्या पलीकडे गंभीर गुन्ह्यांचे प्रमाण, राज्यनिहाय भिन्नता आणि डिजिटल व आर्थिक फसवणुकीत वाढ अशा धोकादायक प्रवृत्त्या दिसून येत आहेत. या आकडेवारीच्या प्राथमिक विश्लेषणात दिसते की, वृद्धांविरुद्ध नोंदलेल्या गुन्ह्यांमध्ये सर्वाधिक प्रमाण 'साधे दुखापत' किंवा शारीरिक अत्याचारांचे आहे, परंतु त्याचवेळी चोरी, ठगी/बनावट/फसवणूक आणि आर्थिक शोषण या आर्थिक स्वरूपाच्या गुन्ह्यांनी मोठ्या प्रमाणावर वृद्धांना लक्ष्य केले आहे, हे विशेषतः महत्त्वाचे आहे. कारण आर्थिक शोषण हे वृद्धांची आत्मनिर्भरता आणि मानसिक स्वास्थ्य यांना परावृत्त करते व सामाजिक पुनर्वसन ही कठीण करते.

राज्यस्तरावरचे विश्लेषण असे दर्शवते की काही राज्ये आणि महानगर वारंवार उच्च नोंदीसह समोर येत आहेत; एनसीआरबी-आधारित २०२३ आकडेवारीनुसार मध्य प्रदेशमध्ये ५,७३८ प्रकरणे नोंदली गेली आणि महाराष्ट्रात ५,११५ प्रकरणे नोंदली गेली, तर तामिळनाडू व कर्नाटकसह इतर काही राज्यांतही वृद्धांविरुद्ध प्रकरणांचे प्रमाण उच्च राहिले आहे. यामुळे ह्या प्रदेशांतील स्थानिक सामाजिक रचना, कुटुंबीय संघर्ष, आर्थिक असमानता आणि पोलीस व प्रशासनाच्या प्रतिसादातील फरक या सर्वांचा सखोल अभ्यास आवश्यक होतो.महानगरांमध्येही वृद्धांविरुद्धचे गुन्हे महत्त्वाचे आहेत; दिल्ली, बंगळूरु आणि मुंबई यांसारख्या शहरांमध्ये वृद्धांविरुद्ध नोंदवलेली प्रकरणे वारंवार उच्च आढळतात व मोठ्या शहरांतील विभक्त कुटुंबसंरचना, सामाजिक अलगापन व सार्वजनिक ठिकाणी असलेली असुरक्षितता यांचा वृद्धांच्या अतीव संवेदनशीलतेशी सुसंगत संबंध आहे.

समाजशास्त्रीय दृष्टीने ह्या समस्येचे मूळ अनेक स्तरांवर आहे. पहिले आणि सर्वात थेट कारण म्हणजे कुटुंबरचना आणि पिढीगत बदल-पारंपरिक संयुक्त कुटुंबापासून विभक्त आणि एकल-व्यक्ती कुटुंबाकडे गेलेली बदलती प्रवृत्ती वृद्धांना वैयक्तिक तसेच सामाजिक आधारापासून वंचित करते; ज्यामुळे अनेक वृद्ध एकटेपणाचा अनुभव घेतात, नियमित सामाजिक निरीक्षण कमी होत म्हणून शारीरिक आणि आर्थिक शोषणाचे धोके वाढतात. दुसरे कारण, आर्थिक असुरक्षितता-अनेक ज्येष्ठ नागरिकांचे उत्पन्न मर्यादित पेन्शन, बचत वा कौटुंबिक अवलंबित्वावर अवलंबून असते; अशा आर्थिक निर्भरतेमुळे ते नातेवाइकांद्वारे होणाऱ्या दडपणाचे आणि मालमत्तेवरील दबावाचे लक्ष्य बनतात. तिसरे कारण, सामाजिक प्रतिष्ठेच्या अभावामुळे वृद्धांचे स्थान कमी झाले आहे; कामावरून निवृत्त झालेल्या व्यक्तींना कुटुंबात व समुदायात कमी महत्त्व दिले जाणे, त्यांची मते दुर्लक्षित होणे आणि निर्णय प्रक्रियेपासून त्यांना वगळणे ह्या सर्वांचा मानसिक व सामाजिक परिणाम गंभीर स्वरूपाचा असतो. चौथे कारण, तंत्रज्ञान आणि डिजिटलीकरणामुळे निर्माण झालेले नवीन प्रकारचे धोके-ऑनलाइन बँकिंग, मोबाइल पेमेंट्स, ओटीपी व कॉल स्कॅम्स यांनी वृद्धांना आर्थिक फसवणुकीसाठी अतिशय संवेदनशील केले आहे; त्यांची डिजिटल साक्षरतेची कमतरता आणि अगदी विश्वसनीय वाटणाऱ्या प्लॅटफॉर्म्सचा गैरवापर या प्रक्रियेला चालना देतो. पाचवे आणि अत्यंत निर्णायक कारण म्हणजे न्यायप्रणाली आणि अंमलबजावणीच्या प्रक्रियेत असलेली कमकुवतता-जरी चरळपींशपरपलश रपव थशश्रषरीश ेष झरीशर्पीीं रपव डशपळी उळींळूशपी -लीं, २००७ सारखे कायदे अस्तित्वात असले तरी प्रत्यक्ष तक्रार नोंदविणे, पोलिसांच्या संवेदनशीलतेची कमतरता, आरोग्यामुळे पोलीस ठाण्यापर्यंत पोहोचण्याची अडचण आणि न्यायप्रक्रियेतील मंदगती या सर्वांमुळे अनेक प्रकरणे कागदोपत्री नोंदही होत नाहीत आणि जे नोंदले जातात त्यांची तपासणी व दोषसिद्धी हळूहळू होते, ज्यामुळे पीडितांना न्याय मिळण्याचा विश्वास कमी होतो. विशेषतः आर्थिक स्वरूपाचे गुन्हे ठगी, बनावट व्यवहार, फसवणूक आणि किंग-आधारित ठगी यांची वाढ ही काळजीची बाब आहे कारण ती वृद्धांच्या आर्थिक सुरक्षिततेवर थेट हल्ला करते. एनसीआरबी आणि माध्यमिक अहवालातील आकडे दाखवतात की महानगरांमधील आणि काही राज्यांमधील तज्ज्ञ प्रकारात फसवणूक आणि बनावट व्यवहार मोठ्या प्रमाणात नोंदले गेले आहेत; अनेकदा पेन्शन खाते, बँक डिटेल्स, ओटीपी किंवा विश्वासार्ह वाटणाऱ्या कॉल्सद्वारे पैसे हस्तांतरित करण्याची सवय वापरून अनेक वृद्ध मोठ्या आर्थिक नुकसानाला सामोरे गेले. या प्रकारच्या गुन्ह्यांचा परिणाम तत्कालीन वित्तीय नुकसानांव्यतिरिक्त दीर्घकालीन मानसिक ताण, सामाजिक शत्रुता व आत्मसन्मान घट असतो. काही प्रकरणांमध्ये कोणत्याही आर्थिक मदतीला पुनरागमन कठीण ठरते आणि वृद्धांचे जीवनमान लक्षणीयरीत्या खालावत.शारीरिक अत्याचार आणि घरगुती हिंसाचाराचे स्वरूपही व्यापक आहे; अहवालात 'साधे दुखापत' या श्रेणीतील प्रकरणांची उच्च संख्या दाखवली गेली असून, घरातील कलह, पैशांसाठीचे वाद, वारसाहक्काचे तंटे किंवा जीवनसाथी/कुटुंबातील सदस्यांद्वारे होत असलेले दुर्व्यवहार ही कारणे अनेकदा समोर येतात. विशेषतः जिथे वृद्धांची आरोग्यदृष्टीने निर्भरता जास्त असते आणि सामाजिक-पारंपरिक आधार कमी झालेला असतो, तिथे घरगुती हिंसा आणि परित्यागाचे प्रकार वाढतात.

# पाणीदार लोकशक्ती! निझरा नदीत सलग पाच वर्षे अडीच किमी नांगरटी

## १० ते १५ गावांची पाणीटंचाई मिटणार



**दैनिक वादळ वार्ता**
**नंदुरबार । दिपक गोसावी**

पाण्याच्या समस्येवर सरकारी मदतीची वाट न पाहता, तळोदा तालुक्यातील मोड गावातील ग्रामस्थ आणि तरुणांनी लोकसहभागातून एक अनोखी जलक्रांती घडवली आहे. गेल्या पाच वर्षांपासून सातत्याने राबवलेल्या 'पाणी अडवा, पाणी जिरवा' मोहिमेमुळे आता निझरा नदी परिसरातील १० ते १५ गावांचा पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी मिटणार आहे.निझरा नदी पावसाळ्यानंतर लगेच कोरडीठाक पडायची, ज्यामुळे परिसरातील शेतकरी आणि ग्रामस्थांना पाण्याची मोठी वणवण करावी लागत होती. यावर मात करण्यासाठी मोड गावातील युवकांनी पाच वर्षांपूर्वी 'जलसंवर्धन समिती' स्थापन केली.या समितीच्या माध्यमातून दरवर्षी परतीच्या पावसानंतर नदीपात्रात ट्रॅक्टरच्या मदतीने तब्बल दोन ते अडीच किलोमीटरलांबीची नांगरटी केली जाते. या नांगरटीमुळे पाण्याचे नैसर्गिक बंधारे तयार होऊन, पाणी नदीपात्रात साठते आणि हळूहळू जमिनीत सिंचन होते.या उपक्रमाची सर्वात मोठी खासियत म्हणजे, तो पूर्णपणे लोकसहभागातून चालतो.


गावातील नागरिक स्वखुशीने लोकवर्गणी गोळा करतात., या निधीतून सहभागी होणाऱ्या ट्रॅक्टर मालकांना इंधनाचा खर्च दिला जातो. गावातील सर्व ट्रॅक्टर मालक आपले ट्रॅक्टर घेऊन या कार्यात उत्स्फूर्तपणे सहभागी होतात. या उपक्रमाच्या उद्घाटनावेळी डॉक्टर पुंडलिक राजपूत, प्रविणसिंग राजपूत, मनोज चौधरी, संजय थोरात, महेश नवले गुलाबसिंग गिरासे, पुरुषोत्तम चव्हाण, भगवान राजपूत, किशोर पाटील, विलास पाटील, विजय कडरे यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते, हे सामूहिक एकजुटीचे प्रतीक आहे. सातत्याने केलेल्या या परिश्रमामुळे परिसरातील भूजल पातळीत लक्षणीय वाढ झाली आहे: नदीपात्रात पाणी साठून जिरल्यामुळे परिसरातील कूपनलिका आणि विहिरींची पाणीपातळी वाढली आहे. निझरा नदीवरील या जलसंवर्धनाचा थेट फायदा परिसरातील १० ते १५ गावांना होणार आहे. यामुळे भविष्यात पाण्याची टंचाई दूर होईल. मोड गावातील तरुणाई आणि ग्रामस्थांनी सामूहिक प्रयत्नातून जलसंवर्धनाचा जो आदर्श घालून दिला आहे, तो राज्यातील प्रत्येक गावाने अनुकरण करण्यासारखा आहे. ही केवळ नांगरटी नसून, भविष्यातील पाण्याची शाश्वती आहे.


# कार्तिक लेहणे याचे सुपर डान्सर शो मध्ये यश

## शिल्पा शेट्टी, भाग्यश्री यांनी केले कौतुक

**दैनिक वादळ वार्ता**
**बीड । प्रतिनिधी**

बीड येथील कार्तिक ज्ञानेश्वर लेहणे याने सोनी टेलिव्हिजन वरील डान्स रियालिटी शो सुपर डांसर मध्ये यश मिळवले आहे. त्याची आता सुपर डांसर सीजन सहा मध्ये निवड झाली आहे. बीड येथील तुळजाई नगर मधील रहिवासी कार्तिक ज्ञानेश्वर लेहणे याने आपल्या नृत्य कौशल्याने सर्वांचीच मने जिंकली आहेत. कार्तिक याने यापूर्वी मी होणार सुपरस्टार जल्लोश ज्युनियर चा या मराठी शो मध्ये हि सिने अभिनेता अंकुश चौधरी सोबत काम केले तसेच विविध स्पर्धांमध्ये यश मिळवले असून दिनांक २७ व २८ सप्टेंबर रोजी सोनी टेलिव्हिजन वरील सुपर डान्सर शो मध्ये त्याने नृत्य सादर केले.. त्याच्या या नृत्य कौशल्याचे कौतुक अभिनेत्री शिल्पा शेट्टी गीता माँ व भाग्यश्री यांनी केले. या वेळी शिल्पा शेट्टी यांनी कार्तिक याची सुपर डान्सर सीजन सहा साठी निवड देखील जाहीर केली. राज्यभरातून केवळ दोनच मुले सुपर डांसर मध्ये सहभागी झाले आहेत तर मराठवाड्यातील कार्तिक हा एकमेव आहे. कार्तिकेने सादर केलेले नृत्य प्रसिद्ध कोरिओग्राफर तुषार शेट्टी यांनी कोरिओग्राफ केले होते. कार्तिक याने मिळवलेल्या या यशाबद्दल त्याचे अभिनंदन केले जात आहे.






# महापालिका निवडणुकी साठी भाजपची मोर्चेबांधणी




महापालिका निवडणुका आता काही महिन्यांवर आल्या आहेत. महापालिकेत सत्ता मिळवण्यासाठी सत्ताधारी भाजपने आतापासूनच तयारीला सुरुवात केली असून, मित्रपक्षांसह आघाडीतील अनेक दिग्गजांना पक्षात घेण्याकरिता यश मिळवले आहे. येत्या काही दिवसांतच सर्वांचे पक्षप्रवेश होणार असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपमध्ये मोठ्या प्रमाणात इनकमिंग होणार आहे हे निश्चित आहे.महापालिकांच्या गेल्या चार वर्षांपासून रखडलेल्या निवडणुका आता डिसेंबर-जानेवारी महिन्यात होणार असल्याचे स्पष्ट आहे. त्यानुसार आता सर्वच राजकीय पक्षांनी आणि इच्छुकांनी निवडणुकीसाठी जोरदार तयारीला सुरुवात केली आहे. या निवडणुकीत राज्यातील सत्ताधारी भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे एकत्र येऊन महायुतीच्या माध्यमातून निवडणूक लढविणार की निवडणुकांना स्वतंत्रपणे सामोरे जाणार यासंबधीचे चित्र अद्याप अस्पष्टच आहे. मात्र, २०१७ ला महापालिकेत तब्बल ९७ जागा जिंकून एकहाती सत्तेत आलेल्या भाजपने आता पुन्हा स्वबळावर सत्तेत येण्यासाठी जोरदार मोर्चेबांधणी सुरू केली आहे. त्यासाठी २०१७ चा फॉर्म्युला पुन्हा वापरला जाणार असून, पुन्हा एकदा विरोधी पक्षातील मातब्बरांना पक्षात घेण्यासाठी फिल्डिंग लावण्यात येत आहे. त्याचा सर्वाधिक फटका सत्तेत मित्रपक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसला बसण्याची शक्यता असून, अनेक प्रभागांमध्ये राष्ट्रवादीचे काही दिग्गज इच्छुक गळाला लावण्यात भाजपने यश मिळविले असल्याचे सांगण्यात येत आहे. लवकरच या सर्व इच्छुकांचा अधिकृत पक्षप्रवेश होणार असल्याचे सांगण्यात आले.महापालिका निवडणुकीसाठी चार सदस्यीय प्रभाग पद्धतीने एकूण ४१ प्रभाग तयार झाले आहेत. त्यानुसार १६५ जागांसाठी ही निवडणूक होणार आहे. गत निवडणुकीत भाजपचे ९७ नगरसेवक निवडून आले होते. ११ समाविष्ट गावांच्या समावेशानंतर झालेल्या पोटनिवडणुकीत दोनपैकी भाजपचा एक नगरसेवक निवडून आला होता. त्यामुळे भाजपच्या नगरसेवकांची संख्या ९८ झाली होती. त्यातच कार्यकाळ संपल्यानंतर शिवसेनेच्या ५ माजी नगरसेवकांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. त्यामुळे थेट १०४ जागांवर भाजपचा आता दावा असणार आहे. मात्र, या वेळेस भाजपने थेट १२५ जागांचे टार्गेट ठेवले असल्याचे सांगण्यात येत आहे. काँग्रेसचा माजी नगरसेवकही भाजपच्या वाटेवर आहे, तर शिवसेनेच्या दोन माजी नगरसेवकांपैकी नक्की कोणाला पक्षात घ्यायचे, हे अद्याप निश्चित होत नसल्याचे सांगण्यात येत आहे. पर्वती मतदारसंघात काँग्रेसमधून बाहेर पडलेल्या माजी पदाधिकाऱ्यांचाही प्रवेश निश्चित असल्याचे सांगण्यात येत आहे. राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांचा या पक्ष प्रवेशाला अद्याप ग्रीन सिग्नल मिळाला नसला, तरी निवडून येण्याची क्षमता या निकषात संबधित पदाधिकाऱ्यांना भाजपचे दरवाजे उघडले जातील अशीच चर्चा आहे. सर्वाधिक मोठा धक्का वडगाव शेरी मतदारसंघात बसण्याची शक्यता आहे. येथील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या आमदारांच्या चिरंजिवांच्या पक्षप्रवेशाची गेल्या काही दिवसांपासून जोरदार चर्चा सुरू आहे. मात्र, स्वत: आमदार आणि त्यांच्या चिरंजीव या केवळ अफवा असल्याचे सांगत आहेत. मात्र, ही चर्चा प्रत्यक्षात खरी ठरल्यास पवारांच्या राष्ट्रवादीला मोठा फटका बसून भाजपसाठी मोठी जमेची बाजू ठरू शकणार आहे. या शिवाय तुतारीकडे असलेली एक माजी नगरसेविका भाजप प्रवेशासाठी इच्छुक असल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र, अद्याप त्यांना ग्रीन सिग्नल मिळालेला नाही. आमदार पुत्राच्या प्रवेशाची चर्चा सुरू असताना त्याला मोठ्या प्रमाणात विरोध होताना दिसून येत आहे. आपण समोर येऊन बोलावं तर पक्षाची शिस्त मोडली जाईल. या भीतीने कार्यकर्ते बोलत नाहीयेत. संधीसाधू लोक पक्षात घेऊन पक्षासाठी प्रामाणिकपणे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचे काय असा प्रश्नदेखील यानिमित्ताने उपस्थित होत आहे.संबंधित प्रभागातील राजकीय गणिते आणि निवडणुकीचा सर्व्हे? लक्षात घेऊनच आगामी काळात यासंबंधीचा निर्णय घेतला जाऊ शकतो. याशिवाय मित्रपक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसमधील एक माजी नगरसेवक आणि ज्या प्रभागात भाजपचे मजबूत उमेदवार नाहीत, अशा प्रभागांमधील इच्छुकांना पक्षात घेण्याच्या हालचाली सुरू आहेत. त्यासाठी संबंधितांबरोबर चर्चाही झाल्या असून, निवडणुकीतील युतीचे चित्र स्पष्ट झाल्यानंतर त्यावर पुढील कार्यवाही होणार असल्याचे सांगण्यात येत आहे. हडपसर मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसच्या इच्छुकांना भाजपने अशाच पद्धतीने टार्गेट केले असल्याचे सांगितले जात आहे.

कोथरूड, वडगाव शेरी अन् पर्वती टार्गेटवर कोथरूड हा भाजपचा सर्वात मजबूत बालेकिल्ला मानला जातो. मात्र, गत महापालिका निवडणुकीतही विरोधी पक्षाचे चार नगरसेवक निवडून आले होते. त्यामुळे आता सर्वच्या सर्व जागांवर भाजपचे नगरसेवक निवडून आणण्याचे नियोजन करण्यात आल्याचे सांगण्यात आले. त्यासाठी शिवसेना, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसला तीन पक्षांना खिंडार लावण्यात यश मिळविले असल्याचे सांगण्यात येत आहे. राष्ट्रवादीच्या एका बड्या पदाधिकाऱ्यांच्या चिरंजीवांचा पक्षप्रवेश निश्चित झाल्याचे सांगण्यात येत आहे. अंतिम प्रभाग रचना जाहीर महापालिकेची अंतिम प्रभाग रचना जाहीर झाली असून ती सत्ताधारी भाजपसाठी अनुकूल आहे. आता आरक्षणाकडे इच्छुकांचे डोळे लागले आहेत.

# माहिती अधिकार कायद्याची प्रभावी अंमलबजावणीसाठी अर्जदार, शासकीय यंत्रणेत समन्वय आवश्यक–राज्य माहिती आयुक्त भूपेन्द्र गुरव

**दैनिक वादळ वार्ता । अहिल्यानगर । प्रतिनिधी**

माहिती अधिकार कायद्यात अर्जदार, जनमाहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी व राज्य माहिती आयोग हे चार घटक अत्यंत महत्त्वाचे आहेत. या चार घटकांमध्ये समन्वय राहिल्यास माहिती अधिकार कायद्याची प्रभावी अंमलबजावणी शक्य होईल, असे प्रतिपादन राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठाचे राज्य माहिती आयुक्त भूपेन्द्र गुरव यांनी केले.

माहिती अधिकार सप्ताहानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित चर्चासत्रात श्री. गुरव प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. यावेळी जिल्हा पुरवठा अधिकारी हेमा बडे,उपजिल्हाधिकारी शारदा जाधव,सहायक आयुक्त (प्रशासन) प्रशांत खांडकेकर, नाशिक खंडपीठाचे कक्ष अधिकारी चंद्रकांत कातकडे उपस्थित होते.






श्री. गुरव म्हणाले, माहिती अधिकार अर्जदारांनी अर्ज करताना आवश्यक ती दक्षता घ्यावी. ज्या विभागाची माहिती हवी आहे, त्या विभागाकडेच अर्ज सादर करावा. एकाच विभागातील कनिष्ठ कार्यालयाशी संबंधित माहिती थेट त्या कार्यालयाकडे मागणे अधिक योग्य ठरेल. यामुळे वेळेची बचत होईल.

ते पुढे म्हणाले, माहिती अधिकार अर्जामध्ये मागितलेल्या माहितीबाबत स्पष्टता असावी. आवश्यक कालावधी स्पष्ट नमूद करावा. अर्जदारांनी प्रथम अपिल योग्य कार्यालयाकडेच करावा.

श्री. गुरव यांनी स्पष्ट केले की, माहिती अधिकार अर्जात अर्जाच्या तारखेपेक्षा अर्ज शासकीय कार्यालयात प्राप्त होण्याची तारीख महत्त्वाची असते. अर्ज प्राप्त झाल्यानंतर ३० दिवसांच्या आत माहिती देणे विभागाला बंधनकारक आहे.

कायद्याचा अभ्यास ऐकून न होता वाचनातूनच होतो. त्यामुळे प्रत्येकाने माहिती अधिकार कायद्याचा सखोल अभ्यास करावा.

माहिती अधिकाराचा अर्ज साध्या कागदावर कोर्ट फी स्टॅम्प लावून करता येतो, असेही त्यांनी सांगितले. तसेच, शासकीय कार्यालयांमध्ये जनमाहिती अधिकारी किंवा प्रथम अपिलीय अधिकारी कोण असावा, हे ठरविण्याचा अधिकार राज्य माहिती आयोगाकडे नाही, हेही त्यांनी स्पष्ट केले.

प्रथम अपिलीय अधिकारी आणि राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल करताना अर्जदारांनी कोणती दक्षता घ्यावी, याबाबतही श्री. गुरव यांनी मार्गदर्शन केले.या चर्चासत्रास जिल्ह्यातील विविध शासकीय विभागांचे जनमाहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी आणि माहिती अधिकार कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**ऑनलाईन सुनावणीची सुविधा देणारे राज्यातील पहिले खंडपीठ**

राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठाने द्वितीय अपिलांच्या सुनावणीसाठी अर्जदारांना ऑनलाईन उपस्थित राहण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. ऑनलाईन सुनावणीची सुविधा सुरू करणारे नाशिक खंडपीठ हे राज्यातील पहिले व एकमेव खंडपीठ असल्याचेही श्री. गुरव यांनी सांगितले.

# आंतरजिल्हास्तरीय ९ व्या कराटे चॅम्पियनशिप मध्ये दिव्यातील मुलांचा डंका

**दैनिक वादळ वार्ता । ठाणे**




श्रीराम शोतोकन कराटे दो आणि कुबुडो असोसिएशन ठाणे (डीआयव्हीए) च्या एकूण ३९ विद्यार्थ्यांनी सांताक्रूझ पश्चिम येथील इंडियन एअरलाइन्स आयडियल स्कूलमध्ये झालेल्या ९ व्या आंतरजिल्हा स्तरीय कॅम्पो चॅम्पियनशिपमध्ये एकूण ६० पदके जिंकून दिवा शहराचे नाव उंचावले आहे तर क्रिश मुदलियार, नमिष चौगुले, ओम सोनवणे, विहान पिंपळे, रुद्र उत्तेकर, प्रत्युष बेलुसे, अर्णव बोटले, संचित देवर्डे, वैष्णव पानमड, इमॅन्युएल विनोदकुमार, वंश आडकर, विघ्नेश धनवे, स्वयाली पाले, यामी गुप्ता, प्रत्युष मोरे, प्रत्युष मोरे, व्ही. सार्थक गमरे, रॉनी वर्मा आणि आदित्य शेट्टी श्रेया साव यांनी सुवर्णपदक, युविका पाटील, अवनी कदम, लावण्य पांचाळ, स्वरा वाडकर, रुद्र चाळके, स्वरा कुवर, विराज पटवा, ऋषभ शिंदे आणि कनिष्क प्रजापती यांनी रौप्य पदक जिंकून शाळेचे नाव उंचावले. तसेच समर्थ गुंजाळ, अश्विन सिंग, सोहम जावळे, आयुष गुप्ता, योगेश राठोड, श्रावणी बोडके, मयंक सिंग, मयंक मोरे यांनी कांस्यपदक पटकावले.केईएमपीओ महाराष्ट्राचे सह–सचिव शिहान ऋषिकेश श्रीराम भगत यांनी सर्व विद्यार्थ्यांनी दाखवलेल्या कठोर परिश्रमाचे आणि आत्मविश्वासाचे कौतुक केले.

सर्व पदक विजेत्यांचे अभिनंदन केले आणि त्यांना भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या तसेच त्यांनी सर्व विद्यार्थी, संस्थेचे कर्मचारी आणि या महत्त्वाच्या स्पर्धेत दिलेल्या महत्त्वपूर्ण योगदानाबद्दल आभार मानले, ज्यात सोके रवी लालवानी (ग्रँड मास्टर), सोके डॉ. जगदीश सिंह, शिहान विजय सिगवान (केईएमपीओ महाराष्ट्राचे सचिव) आणि शिहान मेल्विन जोसेफ (केईएमपीओ महाराष्ट्राचे उपाध्यक्ष) यांचा समावेश आहे.

# पालिका कर्मचाऱ्यांना दिवाळीनिमित्त महानगर सफाई कर्मचारी संघाची ३२००० सानुग्रह अनुदानाची मागणी

**दैनिक वादळ वार्ता । पनवेल । प्रतिनीधी**

महानगरपालिकेच्या विविध खात्यातील कर्मचारी – कामगारांना दिवाळीनिमित्त दिल्या जाणाऱ्या सानुग्रह अनुदानाची ओढ लागली आहे. महानगर सफाई कर्मचारी संघाने २०२५–२६ या आर्थिक वर्षासाठी कामगार कर्मचाऱ्यांना ३२००० सन सानुग्रह अनुदान देण्याची मागणी महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्याकडे केली आहे.





पनवेल महानगर पालिका क्षेत्रात कोरोना कालावधीत आपला जीव धोक्यात घालून या कर्मचाऱ्यांनी विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्याकरीता शर्थीचे प्रयत्न केले होते. सर्व प्रभागातील परिसरात दैनंदिन । रस्ते सफाई / गटर सफाई / जंतुनाशक फवारणी व धूर फवारणी प्रभाविपणे करण्यात येत आहे. तसेच सफाई, पाणी पुरवठा कामगार ऊन, वारा, पाऊस, याची कोणतीही पर्वा न करता आपली सेवा चोख बजावत आहेत. नागरिकांची गैरसोय होऊ न त्यांना कोणतीही अडचण होवू न देता व्यवस्थितपणे कर्तव्य पार पाडत आहेत. असा कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड व आनंदात जावे म्हणून त्यांना दिवाळी म्हणून सानुग्रह अनुदान देण्यात यावे. यावर्षी सण दि १८ ऑक्टोंबर २०२५ पासून दिवाळी सण सुरु होत आहे. पनवेल महानगर पालिकेतील सर्व कर्मचारी, सर्व कामगार, सर्व सफाई कर्मचारी तसेच कंटात्री, रोजंदारी व ठोकपगारी सर्व वाहन चालक व सफाई कर्मचारी या सर्वांसाठी दिवाळी सण आनंदात साजरा करता यावा याकरिता सानुग्रह आनुदान सण रुपये ३२,०००/– मिळावेत. व सदरचे सानुग्रह अनुदान दिनांक १८ ऑक्टोंबर २०२५ च्या १० दिवस आगोदर कर्मचाऱ्यांना मिळावेत अशी मागणी महानगर सफाई कामगार संघाचे जिल्हा अध्यक्ष रवींद्र खानवकर, संपर्क प्रमुख रायगड जिल्हा महानगर सफाई कर्मचारी संघ रायगड जिल्हा संपर्क प्रमुख राकेश गोंधळी यांनी लेखी निवेदनाने पनवेल महानगर पालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्याकडे मागणी केली आहे.

# संवेदनशील लोकप्रिय मंत्री भरतशेठ गोगावले यांची मानवतावादी तत्परता

## अपघातग्रस्त तरुणांना तात्काळ उपचारांसाठी आपल्या खासगी वाहनातून उपजिल्हा रुग्णालयात केले दाखल

**दैनिक वादळ वार्ता माणगाव**



नेहमीच रात्री अपरात्री अपघातग्रस्तांच्या मदतीला धावून जाणाऱ्या संवेदनशील मनाचे लोकप्रिय मंत्री नामदार भरतशेठ गोगावले आपल्या निवासस्थाकडे जात असताना यांच्या वाहन चालकाच्या रात्री एक वाजता माणगाव कांदळगाव परीसरात रस्त्याच्या कडेला गर्द झाडीतून दोन अपघातग्रस्त तरुणांची आर्त हाक हेल्प, हेल्प! अशी हाक कानावर पडली. वाहन चालकाने मंत्री महोदयांना सांगितले, मंत्री महोदयांनी ड्रायव्हर ला तात्काळ गाडी थांबवायला सांगितली आणि संवेदनशील मनाचे मंत्री भरतशेठ गोगावले त्या अपघातग्रस्तां जवळ गेले. आणि त्या जखमी रक्तबंबाळ तरुणांना आपल्या वाहनातून माणगाव उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यासाठी माणगाव च्या दिशेने रवाना झाले. राज्याचे कॅबिनेट मंत्री नामदार भरतशेठ गोगावले हे मुंबईवरून महाडकडे निजामपूर मार्गे आपल्या निवासस्थानाकडे परतत असताना, रात्री सुमारे १ वाजताच्या सुमारास मौजे कांदळगाव तालुका माणगाव हद्दीतून जात असताना हेल्प, हेल्प अशी हाक मंत्री महोदयांचे वाहन चालक यांना ऐकू आली. त्या आवाजाच्या दिशेने पाहिल्यावर झाडीत दोन अपघातग्रस्त दुचाकीस्वार अडकलेले दिसले. मंत्री भरतशेठ गोगावले यांनी तात्काळ आपल्या ताफ्याला थांबवून घटनास्थळी धाव घेतली. त्यांच्या सहकाऱ्यांच्या आणि ताफ्यातील पोलिसांच्या मदतीने त्या दोन्ही तरुणांना झाडीतून बाहेर काढून स्वतःच्या वाहनातून उपचाराकरिता माणगाव उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले.दरम्यान, युवा जिल्हाप्रमुख विपुल उभारे यांनी आधीच रुग्णालयातील डॉक्टर्स आणि कर्मचाऱ्यांना सतर्क केले होते. त्यामुळे मंत्री महोदय पोहोचताच रुग्णालयातील स्टाफने तात्काळ उपचार सुरू केले. या अपघातात एका तरुणाच्या डोक्याला १७ टाके पडले असून दुसऱ्या तरुणाचा हात व पाय फ्रॅक्चर झाला आहे. दोघांवर माणगाव उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अपघातग्रस्तांना सुरक्षितपणे रुग्णालयात दाखल करून, त्यांच्या प्रकृतीची खात्री करून घेतल्या नंतरच मंत्री भरतशेठ गोगावले महाडकडे रवाना झाले.

# यापूर्वी जाहीर केलेली मदत पॅकेज मध्ये समाविष्ट करण्याची आवश्यकता नव्हती–अंबादास दानवे

**दैनिक वादळ वार्ता । छत्रपती संभाजीनगर (वृत्तसंस्था)**–राज्य सरकारने सप्टेंबर महिन्यात राज्यात झालेल्या अतिवृष्टीसाठी जाहीर केलेली ३१ हजार ६२८ कोटी रुपयांची मदत शेतकऱ्यांची संपूर्णपणे दिशाभूल करणारी असल्याचा गंभीर आरोप शिवसेना नेते अंबादास दानवे यांनी केला. या मदती मध्ये प्रामुख्याने यापूर्वी दिलेले २ हजार २०० कोटी रुपये, पिक विम्याचे ५ हजार कोटी रुपये, पिक नुकसानीचे एनडीआरएफ निकषाप्रमाणे ६ हजार १७५ कोटी रुपये, पिक नुकसान राज्य सरकारची मदत ६ हजार ५०० कोटी रुपये, पायाभूत सुविधा १० हजार कोटी रुपये आणि जीवित व वित्तहानी १७५३ कोटी रुपये असे एकूण ३१ हजार ६२८ कोटी रुपये होतात, असल्याची माहिती दानवे यांनी पत्रकार संभाजीनगर येथे आयोजित परिषदेत दिली.यापूर्वी जाहीर केलेली मदत सदरील पॅकेज मध्ये समाविष्ट करण्याची आवश्यकता नव्हती. विमा विषयी राज्य सरकारने हमी दिली असली तरीही विमा कधी मिळेल याची शाश्वती नाही. विमा कंपन्यांच्या कारभाराची पार्श्वभूमी बघता सदरील विमा मिळणे अशक्यच असल्याचे अंबादास दानवे यावेळी म्हणाले.पिक विम्याची रक्कम फक्त ४५ लाख शेतकऱ्यांनी भरलेल्या विमा धारकांना मिळणार आहे. राज्य सरकारकडे किती शेतकऱ्यांनी विमा भरलेला आहे याची माहिती राज्य सरकारकडे नाही. एनडीआरएफ निकषाप्रमाणे ६ हजार १७५ कोटी रुपये राज्य सरकार देत असले तरीही यामध्ये सरकारचे मोठे कर्तृत्व नाही. पायाभूत सुविधांसाठी घोषित केलेल्या १० हजार कोटीचा कसलाही थेट फायदा शेतकऱ्यांना होणार नसल्याची टीका दानवे यांनी केली.जीवित व वित्तहानीसाठी १७५३ कोटी रुपयांची मदत जाहीर केली आहे. रब्बी हंगामासाठी ६ हजार ५०० कोटी रुपये घोषित केली हीच एकमेव महत्वपूर्ण घोषणा असल्याचे दानवे म्हणाले. एकूण राज्यातील ६८ लाख पेक्षा अधिक हेक्टर जमिनीचे नुकसान झाले आहे. त्यासाठी फक्त ६ हजार ५०० कोटी रुपयांची मदत खूप अल्प आहे. या सर्व पॅकेजचे गुणोत्तर केले तर अत्यंत कमी मदत जाहीर करून शेतकऱ्यांची फसवणूक राज्य सरकारने केली असल्याचा भांडाफोड अंबादास यांनी केला.पिक विम्याची मदत कधी मिळेल याची माहिती नाही. जनावरांसाठी ३७ हजार रुपये घोषित केले असले तरीही एवढ्या कमी रक्कमेमध्ये कोणतीही गाय व म्हैस येणार नाही. वाहून गेलेल्या जनावरांचे पंचनामे करता येणार नसल्याने शेतकऱ्यांकडील किंवा इतर शासकीय कार्यालयात जनावरांची नोंद ग्राह्य धरण्यात यावी, अशी मागणी दानवे यांनी यावेळी केली.

# तुकाराम महाराजांची गाथा हिंदू आहे ती बुडविणारे हिंदुत्ववादी होते संविधान समाज निर्माण करू शकते ते बुडविण्याचे काम हे सरकार करत आहे

## भाजप,आरएसएसला जनतेला गुलाम करायचे आहे;आता त्यांना बुडविण्यासाठी आपण पेटून उठलो पाहिजे–हर्षवर्धन सपकाळ

**दैनिक वादळ वार्ता । पनवेल । प्रतिनिधी**



देशाचा कारभार भाजपा माध्यमातून आरएसएस चालवत आहे. आरएसएस हा गाईला चुसणारा गोचेंड आहे. ती हिंदुत्ववादी म्हणून गाईचे रक्त पिऊन गाईलाच मारत आहे. आपल्याला या गोचेंडाना मारून गाईला वाचवायची आहे. याना संविधान बुडवून भारतीय जनतेवर मनुस्मृती लादायची आहे. जनतेला गुलाम बनवायचे आहे हा एकच सैतानी डाव त्यांच्या डोक्यात आहे. तेव्हा आता आपण जनतेने जागे होऊन याना सत्तेतून खाली खेचले पाहिजे. ही लढाई तुम्हाला मला आपल्याला सगळ्यांना ही लढली आरपारची लढावी लागेल असे सांगत काँग्रेसचे प्रदेश अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी आरएसएस आणि भाजपवर कडाडून टीका केली.

काँग्रेसचे कामगार नेते श्याम म्हात्रे यांच्या ७० व्या जयंती निमित्त कामगार मेळावा आणि संविधान जागर या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते वासुदेव बळवंत फडके सभागृहात बोलत होते. ते पुढे म्हणाले श्याम म्हात्रे यांच्या स्मृतींना मी अभिवादन करतो आणि जो काँग्रेसचा सैनिक, काँग्रेस पक्षाच्या नेत्याच्या जन्मदिवसाच्या जयंतीच्या निमित्ताने मला दिवसभर या ठिकाणी उपस्थित होता आले ही खऱ्या अर्थाने श्रद्धांजली आहे. ते गेले मात्र जाताना काँग्रेस पक्षाला एक रत्न देऊन गेले त्या रत्नाचे नाव म्हणजे श्रुती शाम म्हात्रे ! आताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना वोट चोर गद्दी सोड !त्यांना चोर म्हटला जातो राज्याचे मुख्यमंत्रीना लबाड म्हटले जाते. याना आताच हटविले नाही तर लोकशाहीचा शेवट आहे. संविधान वाचवण्यासाठी आपण सगळ्यांनी जिंकण्याच्या इर्षेने लढली पाहिजे. ती जिंकली तर त्यातून ग्रंथाचा उदय होईल. आणि आपले संविधान वाचेल.नवी मुंबई विमानतळाला दि. बा पाटील यांचे नावे देण्यासाठी येथील भूमिपुत्रांचा बारा वर्षापासून लढा चालू आहे. या नावाची प्रक्रिया करण्यासाठी राज्य सरकारला अद्याप तीन महिने लागतात ही येथील भूमीपुत्र जनतेची घोर फसवणूक आहे. त्यांना एकवेळ पंतप्रधान मोदी यांच्या हातून नवी मुंबई विमानतळाचे उद्घाटन करायचे आहे. एका रात्रीत नोटा बदलू शकता, लॉक डाऊन लावू शकता. मग दि बा पाटील यांचे नाव नवी मुंबई विमानतळाला देण्यासाठीचा लढा वर्ष बारा तेरा वर्षापासून सुरू आहे. मग त्यांचे नाव देण्यासाठी अद्याप तीन महिने कशाला पाहिजे असा सवाल ही सकपाळ यांनी केला. आपल्या घरात बाळ जन्माला आलं तर बाळ जन्माला आल्या आल्या बाळाचा नाव लावण्यासाठी बाप लगबग करतो नगरपालिकेत जातो.आणि नाव लावून घेतो. यांच्यात लबाडपणा ठासून भरला आहे. या देशातील जनतेचे रक्त पिणाऱ्यांना सत्तेतून खाली खेचण्यासाठी तुम्हाला मला आपल्याला सगळ्यांना ही लढाई जिंकण्याच्या उद्देशानेच लढली पाहिजे. तर आणि तरच आपली गुलगिरीतून सुटला आहे.लोकशाहीर संभाजी पवार यांनी भाजपची जुलमी राजवट जनतेला कशी गुलामीत जगविते त्यांची काळीकृत्ये जनतेसमोर आणली. संविधान प्रेमाने ओथंबून भरले आहे. पण भाजप आणि आरएसएस यांच्या मनात द्वेष आणि क्रोध भरला आहे. यांनी देश अंधाराकडे चालविला आहे. जनतेचे जगणे मुश्किल करून ठेवले आहे. देशांमध्ये एवढा अत्याचार सुरू आहे. त्यांना संविधान चालूच द्यायचे नाही आणि त्यासाठी सत्ताधाऱ्यांनी २०१८ ला संविधान जळाले. गुलामी आपल्या अंतर्मनात गेलेले होते आणि ती जर काढायची असेल तर या वरच्या सत्ता बदलल्या पाहिजे. आणि त्यासाठी आपले रक्त पेटून उठले पाहिजे. या कार्यक्रमाला हरेश केणी संतोष शेट्टी, आर सी घरत, सुदाम पाटील, सुरेश पाटील, शंभू म्हात्रे, यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी कार्यकर्ते आणि नागरीक उपस्थित होते. वासुदेव बळवंत फडके सभागृह भरून गेले होते काही नागरिकांना जागा नसल्याने त्यांनी सभागृहाच्या बाहेर राहून काँग्रेसचे प्रदेश अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचे भाजप आणि आर एस एस यांच्या विरोधात प्रखर विचार करण्यासाठी नागरीक आवर्जून उपस्थित होते .यावेळी अनेक मान्यवरांची भाषणे झाली. त्यांनी मोदी सरकार आणि फडणवीस सरकारवर जोरदार टीका केली.

# वेळूवन बुद्ध विहार भिमनगर केज येथे वर्षावास व ग्रंथवाचन समारोप संपन्न

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

केज शहरातील वेळूवन बुद्ध विहार भीम नगर येथे वर्षावास व ग्रंथवाचन समारोप संपन्न झाला.बौद्ध धम्मामध्ये वर्षावास हा एक पवित्र, अनुशासनात्मक आणि धम्मशिक्षणासाठी अत्यंत महत्त्वाचा काळ मानला जातो. आषाढ पौर्णिमेपासून सुरू होणारा हा काळ अश्विन पौर्णिमे पर्यंत चालतो. याकाळात वेळूवन विहारामध्ये दरवर्षी प्रमाणे बोधिसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर लिखितबुद्ध आणि त्यांचा धम्म या महान ग्रंथाचे नियमीत वाचन व चिंतन केले गेले तसेच धम्म प्रवचन मालिकेअंतर्गत विविध विषयांवर प्रवचन झाले व धम्म विचार रुजविण्यात आला.

सर्वप्रथम आदर्शांना वंदन करून उपस्थितांनी पंचशील ग्रहण केले.भारतीय बौद्ध महासभेचे शहराध्यक्ष आयु.जयपाल मस्के यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी धम्म प्रवचन मालिकेतील बौद्ध धम्म आणि मानवता या विषयावर भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा पूर्वचे पर्यटन प्रसार चे उपाध्यक्ष आयु.संभाजी सोनवणे यांनी विचार मांडले. यावेळी विहारात भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा पूर्वचे पदाधिकारी कोषाध्यक्ष आयु.सुनील शिंदे, आयु.अरुण पटेकर, आयु.मधुकर कदम, तालुकाध्यक्ष आयु.बालासाहेब जोगदंड, सरचिटणीस आयु.रंजीत घाडगे व कोषाध्यक्ष आयु.बळीराम सोनवणे यांची उपस्थिती होती.

भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी अक्षय हजारे यांची भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या शहराध्यक्ष पदासाठी निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. विहारात येणाऱ्या सर्व बालक बालिका यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या बावीस प्रतिज्ञा, संविधान प्रास्ताविका मुखोद्गत आहेत त्या सर्वांचे कौतुक करण्यात आले यामध्ये विहारात नियमितपणे येणारी साडेचार वर्षाची कु.आर्या हजारे हिने सर्वांना संविधान प्रास्ताविक म्हणून दाखविले तिचा प्रातिनिधिक स्वरूपात सत्कार करण्यात आला.जिल्हा कोषाध्यक्ष आयु.सुनील शिंदे,आयु.अरुण पटेकर,आयु.मधुकर कदम यांनी वेळूवन विहारात चालणाऱ्या कामाबद्दल शुभेच्छा दिल्या.कदम बोलताना म्हणाले , वेळूवन बुद्ध विहार हे तालुक्याचे ऊर्जा केंद्र आहे.आयु.संभाजी सोनवणे यांनी आपला विषय मांडताना बौद्ध धम्म हा मानवता शिकवणारा महान धम्म आहे असे प्रतिपादन केले.



अध्यक्षीय भाषणात आयु.जयपाल मस्के यांनी बुद्ध आणि त्यांचा धम्म या महत्त्वपूर्ण ग्रंथाचे महत्त्व अधोरेखित करत सांगितले की, या ग्रंथामध्ये धम्माच्या शुद्ध शिकवणीसह मानवी मूल्यांचे विवेचन आहे. वर्षावासाच्या काळात याचे वाचन हे बौद्ध अनुयायांसाठी दिशा दाखवणारे ठरते. वर्षावास काळात ग्रंथ श्रवण करण्यासाठी उपस्थित सर्व बौद्ध उपासक-उपासिका,बालक-बालिका यांचे यावेळी आभार मानले.त्याचबरोबर समारोप प्रसंगी उपस्थित भारतीय बौध्द महासभेचे सर्व जिल्हा पदाधिकारी,तालुका पदाधिकारी व शहर पदाधिकारी यांचे आभार मानले.धम्मयान मासिक,सक्रिय सभासद पावती ,महाविहार महाबोधि आंदोलन, तसेच बौद्ध,मातंग,चर्मकार, ओबीसी बंधुभाव परिषद याबद्दल उपस्थितांना माहिती करून दिली. सर्वांनी भारतीय बौद्ध महासभेत सक्रियपणे काम करावे असे आवाहन करण्यात आले.संपूर्ण कार्यक्रमाचे बहारदार संचलन भारतीय बौद्ध महासभेचे शहर सरचिटणीस आयु.शिवकुमार मस्के यांनी केले.प्रास्ताविक आयु.बालासाहेब जोगदंड यांनी केले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी भारतीय बौद्ध महासभेचे माजी शहराध्यक्ष डॉ. प्रभाकर ठोके व आयु.महेंद्र मस्के यांचे योगदान लाभले. यावेळी विहारात भारतीय बौद्ध महासभेचे शहर पदाधिकारी आयु.चंद्रकांत मस्के, कल्याण मस्के, राहुल माने, अजय गालफाडे, शिवमूर्ती हजारे, अक्षय हजारे, सुशील मस्के, दीपक मस्के, प्रमोद मस्के तसेच महिला शाखेच्या तालुकाध्यक्ष आयु.महानंदा गायकवाड,संस्कार सचिव आयु .कौशल्या मस्के महिला शहराध्यक्ष आयु.सुनीता कांबळे, सरचिटणीस आयु.सुरेखा मस्के, विजयमाला हजारे, कलावती हजारे, सुनीता हजारे, जनाबाई मस्के, रत्नमाला मस्के, आशाताई मस्के, पुष्पा मस्के, कुसुम मस्के तसेच सावित्रीबाई कांबळे, अंजली गायकवाड, हौसाबाई हजारे, प्रमिला मस्के, लक्ष्मीबाई मस्के, गंगुबाई मस्के, सिमंताबाई हजारे तसेच रिपाईचे सुनील हिरवे, आश्रूबा खरात,राहुल मस्के, भारत ढालमारे, लखन मस्के यांची उपस्थिती होती. शेवटी सरनत्त घेऊन, खीरदानाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# केंद्रीय युवा महोत्सवात 'पाझर' एकांकिकेला प्रथम पारितोषिक

## तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन विद्यार्थिनींची चमकदार कामगिरी

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

श्रीमती नाथिबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई येथे पार पडलेला राज्यस्तरीय केंद्रीय युवा महोत्सव रविवारी जल्लोषात संपन्न झाला. ४ ते ५ ऑक्टोबरदरम्यान पार पडलेल्या या महोत्सवात प्रादेशिक पातळीवर विजेते ठरलेल्या संघांनी विविध कलाप्रकारांमध्ये सहभाग नोंदवला.या महोत्सवात तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, बीडच्या विद्यार्थिनींनी आपल्या अभिनयातून समाजातील स्त्रीच्या वास्तवाला वाचा फोडली. त्यांच्या पाझर या हृदयस्पर्शी एकांकिकेने परीक्षकांची मनं जिंकत पहिला क्रमांक पटकावला.



या नाट्यप्रयोगातून ग्रामीण स्त्रीजीवनातील संघर्ष, आत्मसन्मान आणि सामाजिक वास्तवाचे जिवंत चित्रण प्रभावीपणे साकारण्यात आले. उत्कृष्ट अभिनय, प्रभावी संवाद आणि दिग्दर्शनामुळे पाझर ने परीक्षक तसेच प्रेक्षकांवर ठसा उमटवला.या विजयामुळे महाविद्यालयीन परिसरात जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले असून, तुलसी शैक्षणिक समूहाचे संस्थापक अध्यक्ष प्रा.प्रदीप रोडे यांनी संपूर्ण टीमचे मनःपूर्वक अभिनंदन करून त्यांच्या मेहनतीचे कौतुक केले.तसेच संस्थेचे विश्वस्त डॉ.सुनील जोंधळे, प्राचार्य डॉ. अश्विनी बेद्रे, प्राध्यापक व सहविद्यार्थ्यांनी विजेत्या संघाचे अभिनंदन केले. संघप्रमुख प्रा.सुप्रिया ससाने, प्रा.श्वेता वंजारे यांच्या नेतृत्वाखाली संघाने उत्कृष्ट कामगिरी बजावली आणि संघाच्या मेहनतीला पारितोषिक मिळाले.

# वडवणी येथे सहकारी पतसंस्था संचालक व कर्मचारी यांचा दोन दिवसीय प्रशिक्षण वर्ग संपन्न

**दैनिक वादळ वार्ता**
**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य सहकारी संघ म.पुणे चे सहकार प्रशिक्षण केंद्र लातूर,व जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बीड यांच्या संयुक्त विद्यमाने वडवणी तालुक्यातील नागरी सहकारीपतसंस्था, पगार सहकारी पतसंस्था संचालक,कर्मचारी यांच्या करीता दोन दिवसीय प्रशिक्षण वर्ग घेण्यात आले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रामलिंग नागरी सहकारी पतसंस्थे चे अध्यक्ष नारायणराव डिगे होते.प्रशिक्षण वर्गात प्राचार्य डॉ.मन्मथ हेरकर, माजी संचालक गजानन नागरी सहकारी बँक बीड, सहकार प्रशिक्षण केंद्र लातूर चे उपप्राचार्य एस. आर.कोळे,प्रमाणित लेखा परीक्षक सी.ए.खोडसे यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले.



समारोप प्रसंगी ए.एस. देशपांडे,सहकार अधिकारी श्रेणी २, प्रमाणित लेखा परीक्षक सी.ए.खोडसे यांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरण करण्यात आले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सूत्रसंचालन,आभार प्रदर्शन वर्ग संयोजक एस. आर.कोळे उपप्राचार्य सहकार प्रशिक्षण केंद्र लातूर यांनी केले.

# बोधगया येथील महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात दिले पाहिजे

## मुंबई आझाद मैदान आंदोलनासाठी केजमध्ये बैठक संपन्न

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

बोधगया हे बिहार राज्यातील गयाजवळ असलेले ऐतिहासिक व धार्मिक स्थान आहे. येथेच भगवान गौतम बुद्धांना ज्ञानप्राप्ती झाली होती. या ठिकाणी उभारलेले महाबोधी विहार हे जगभरातील बौद्ध धर्मीयांसाठी सर्वाधिक पवित्र स्थान मानले जाते. या स्थळाला युनेस्कोने विश्व वारसा यादी मध्ये स्थान दिले आहे.मात्र, बोधगया महाबोधी मंदिराच्या व्यवस्थापनावर हिंदू पुजाऱ्यांचे नियंत्रण असल्यामुळे बौद्ध समाजात असंतोष निर्माण झाला आहे. बौद्ध धर्माचा जन्मस्थान व मुख्य केंद्र असूनही बौद्ध प्रतिनिधींना मंदिराच्या व्यवस्थापनात प्रमुख स्थान नाही, ही खंत बौद्ध बांधवांकडून व्यक्त केली जात आहे.

महाबोधी सोसायटी ऑफ इंडिया ची स्थापना १८९१,साली झाली संस्थापक अनगरिका धर्मपाल यांनी या चळवळीचे नेतृत्व केले होते. पुढे १९५३ मध्ये बिहार सरकारने बोधगया मंदिर व्यवस्थापन अधिनियम लागू केला. या कायद्यानुसार ८ सदस्यीय व्यवस्थापन समिती स्थापन करण्यात आली,



ज्यात ४ हिंदू व ४ बौद्ध सदस्यांचा समावेश करण्यात आला परंतु अध्यक्षपद हिंदू धर्मीयाकडेच राहील असे बंधन ठेवण्यात आले. त्यामुळे बौद्ध समाजाचे असमाधान कायम आहे.सम्राट अशोक यांनी इ.स.पू. तिसऱ्या शतकात येथे मंदिर व बोधीवृक्ष परिसराची निर्मिती केली होती. या पवित्र स्थळावर पुन्हा बौद्ध धर्मीयांचा ताबा यावा, या मागणीसाठी देशभरातील बौद्ध समाज एकवटत आहे.त्याच अनुषंगाने, मुंबई येथे १४ ऑक्टोबर रोजी वार मंगळवार आझाद मैदानात महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात द्यावे या मागणीसाठी भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या मोर्चासाठी शासनाने परवानगी नाकारली असली तरी लाखो बौद्ध बांधव धम्माच्या निष्ठेने या आंदोलनात सहभागी होणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.या पार्श्वभूमीवर केज तालुक्यातील विविध बौद्ध संघटनांची बैठक दिनांक ९ ऑक्टोबर रोजी वार गुरुवार केज येथील शासकीय विश्रामगृहात संपन्न झाली. या बैठकीत आगामी १४ ऑक्टोबरच्या मोर्चात सकल बौद्ध समाजाचा सहभाग वाढवण्यासाठी सविस्तर चर्चा झाली.बैठकीत एक दिवस धम्मासाठी महा बौद्ध महाविहार मुक्ती साठी हा मूलमंत्र स्वीकारून सर्व बौद्ध बांधवांनी मोर्चासाठी सज्ज राहण्याचे आवाहन करण्यात आले. या वेळी केज तालुक्यातील विविध संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक बौद्ध बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उद्धव गित्ते हे राज्य स्तरीय आदर्श ग्रा.पं.अधिकारी पुरस्काराने सन्मानित

**दैनिक वादळ वार्ता**
**गौतम बचुटे । केज**

केज तालुक्यातील साळेगाव येथील रहिवाशी असलेले उद्धव गित्ते यांना पुणे येथील नालंदा संघटना यांच्या वतीने दिला जाणारा आणि मानाचा असलेला आदर्श ग्रामपंचायत अधिकारी हा राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाला आहे.साळेगाव तालुका केज येथील रहिवाशी असलेले उद्धव गित्ते हे सोलापूर जिल्ह्यातील धानोरे तालुका बार्शी येथे ग्रामपंचायत म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी सन २०१६ मध्ये त्यांच्या गावात प्रधान मंत्री आवास योजना अत्यंत प्रभावीपणे



राबवून बेघर धारकांना या योजनेचे लाभ मिळवून दिला आणि अशा बेघरांच्या डोक्यावर त्यांच्या स्व:ताच्या हक्काचे छप्पर देऊन त्यांच्या कुटुंबीयांना हक्काचा निवारा उभा केला. नालंदा संस्थेने केलेल्या सर्वेक्षणात उद्धव गित्ते यांच्या कामाची दखल घेऊन त्यांना नालंदा ऑर्गनायझेशनचा सन २०२५ चा राज्यस्तरीय आदर्श ग्रामपंचायत अधिकारी म्हणून त्यांना पुरस्कार जाहीर केला आहे.दि. ११ ऑक्टोबर रोजी पुणे येथे पत्रकार भवन, नवी पेठ पुणे येथे विशेष पाहुण्याच्या हस्ते आणि मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मान चिन्ह, शाल आणि पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सन्मान करण्यात येणार आहे.

त्यांना मिळालेल्या पुरस्कारा बद्दल धानोरे गावचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ आणि गित्ते यांचे मित्र परिवार, आप्तेष्ट व नातेवाईक यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# स्व.प्रा.लक्षणराव डोईफोडे सर यांच्या जयंती निमित्त शालेय साहित्य व अल्प उपहार वाटप

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

कासारी गावचे भूषण स्व प्रा . लक्षणराव डोईफोडे सर यांच्या ६४ व्या जयंती निमित्त सरपंच अमोल लक्ष्मणराव डोईफोडे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व अल्प उपहार वाटप करण्यात आला. प्रथम स्मृती स्थळावर पुष्पहार अर्पण करून अभिवादन



करण्यात आले. स्व.प्रा. लक्ष्मणराव डोईफोडे सर यांच्या जयंतीनिमित्त कासारी येथे क्रांतीवीर आत्माराम बापू पाटील माध्यमिक विद्यालय कासारी , जिल्हा परिषद शाळा कासारी , जिल्हा परिषद डोईफोडे वस्ती येथे शालेय साहित्य व खाऊ वाटप करण्यात आला. यावेळी सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य सेवा सहकारी सोसायटी सदस्य तसेच शिक्षक वृंद व गावातील ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अंजनासागर प्राथमिक विद्यालयात वन्यजीव सप्ताह उत्साहात साजरा

**दैनिक वादळ वार्ता । वृत्तसेवा**

कन्नड तालुक्यातील पिशोरजवळील अंजनासागर प्राथमिक विद्यामंदिरात वन्यजीव सप्ताह मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांना वन्यजीवांविषयी माहिती मिळावी, पाळीव व जंगली प्राण्यांमधील फरक जाणून घ्यावा, तसेच निसर्गातील समतोलाचे महत्त्व आणि वन्यजीव संवर्धनाची गरज समजावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. वन्यजीव सप्ताह दरवर्षी १ ऑक्टोबर ते ७ ऑक्टोबर दरम्यान साजरा केला जातो. या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात पिशोरचे वनपाल आर. डी. पठाण यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. वन व वन्यजीवांचे संरक्षण ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असून ते निसर्ग संतुलनासाठी अत्यावश्यक आहे, असे त्यांनी आपल्या भाषणात स्पष्ट केले. कार्यक्रमास संस्थेचे संस्थापक अध्यक्ष नारायणराव जाधव प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी झाडे लावा, झाडे जगवा हा पर्यावरणपूरक संदेश देत विद्यार्थ्यांना वृक्षसंवर्धनाचे आवाहन केले. शाळेचे मुख्याध्यापक संतोष निकम यांनी आपल्या मार्गदर्शनात ऑक्सिजनचा स्रोत म्हणून वृक्षांचे आणि निसर्गातील मधमाशांच्या योगदानाचे महत्त्व पटवून दिले.

# बनसारोळा येथे स्टार्स ऑन द अर्थ या मॅगझिनचा प्रकाशन सोहळा उत्साहात संपन्न

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील बनसारोळा येथील आदर्श माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात दिनांक ९ ऑक्टोबर,वार गुरुवार रोजी सकाळी दहा वाजता वर्ग सातवी 'अ' च्या विद्यार्थ्यांनी दिवाळी निमित्ताने तयार केलेल्या स्टार्स ऑन द अर्थ या मॅगझिनचा प्रकाशन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमाचे प्रकाशन प्रभारी मुख्याध्यापक श्री. रामदास अंबाड यांच्या



हस्ते करण्यात आले.या मॅगझिनचे बांधणी कार्य जयदीप पाईकराव या विद्यार्थ्याने कौशल्यपूर्ण रित्या केले असून, संपादक म्हणून सार्थक जोशी आणि सहसंपादक म्हणून करूणा देशमुख यांनी जबाबदारी सांभाळली.मॅगझिनमध्ये विद्यार्थ्यांनी लिहिलेले विविध विषयांवरील लेख, कविता आणि सर्जनशील लेखनाचा समावेश आहे. यामध्ये वर्षभरातील मुला -मुलींचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला.मॅगझिन तयार करण्यासाठी इंग्रजी विषयाचे शिक्षक श्री.एस. व्ही.रोकडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन आणि प्रोत्साहन दिले.या प्रसंगी शाळेतील सर्व शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे वातावरण आनंददायी आणि प्रेरणादायी होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077